कर्मयोग (कर्माच्या माध्यमातून ईश्वरप्राप्ती) : खंड ५

# संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण कर्म

मराठी (Marathi)


**संकलक**

**हिंदु राष्ट्राच्या स्थापनेचा उद्घोष करणारे**

**सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले**

**आणि पू. संदीप गजानन आळशी**



**सनातन संस्था**



**卐 सनातनच्या ग्रंथांची भारतातील भाषांनुसार संख्या 卐**

मराठी ३४५, इंग्रजी २०१, कन्नड १९९, हिंदी १९६, गुजराती ६८, तेलुगु ५४, तमिळ ४४, बंगाली ३०, मल्ल्याळम् २४, ओडिया २२, पंजाबी १३, नेपाळी ३ अन् आसामी २

**ऑगस्ट २०२४ पर्यंत ३६६ ग्रंथांच्या १३ भाषांत ९७ लाख ३३ सहस्र प्रती प्रसिद्ध !**

# ग्रंथाच्या संकलकांचा परिचय

## सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले यांच्या आध्यात्मिक संशोधनकार्याचा संक्षिप्त परिचय



१. ‘ईश्वरप्राप्तीसाठी कला’ याविषयी मार्गदर्शन आणि संगीत, नृत्य इत्यादी कलांचे सात्त्विक सादरीकरण करण्याविषयी संशोधन

२. आचारपालनातील कृती, धार्मिक कृती आणि बुद्धीअगम्य घटना यांचे वैज्ञानिक उपकरणांद्वारे संशोधन

३. शारीरिक आणि मानसिक, तसेच वाईट शक्तींच्या त्रासांवरील उपायपद्धतींविषयी संशोधन

४. २०.९.२०२४ पर्यंत २ बालक-संतांची, तसेच ६० टक्क्यांहून अधिक आध्यात्मिक पातळी असलेल्या २१५ अन् अन्य ९०६ दैवी बालकांची ओळख समाजाला करून दिली आहे. दैवी बालकांविषयी संशोधनही चालू आहे.

५. स्वतःचा (सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचा) देह, स्वतःच्या वापरातील वस्तू यांच्यातील दैवी पालटांविषयी संशोधन अन् स्वतःच्या महामृत्यूयोगाचा संशोधनात्मक अभ्यास

(संपूर्ण परिचयासाठी वाचा – **www.Sanatan.org**)

### सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांचे साधकांना आश्वासन !

स्थूल देह असे स्थळकाळाची मर्यादा ।
कैसे असू सर्वदा सर्वा ठायी ।।
सनातन धर्म माझे नित्य रूप ।
त्या रूपे सर्वत्र आहे सदा ।। – जयंत बाळाजी आठवले
१५.५.१९९६

## पू. संदीप गजानन आळशी यांचा परिचय



सनातनच्या ग्रंथांच्या निर्मितीची सेवा करण्यासह राष्ट्रजागृती आणि धर्मप्रसार करणारे प्रसारसाहित्य (उदा. सनातन पंचांग, धर्मशिक्षण फलक इत्यादी) यांसाठी लेखन करतात. साधना, राष्ट्र अन् धर्म यांसंबंधी नियतकालिक 'सनातन प्रभात'मधून प्रबोधनपर लेखनही करतात.

---

## अनुक्रमणिका

**(काही वैशिष्ट्यपूर्ण मथळे खाली दिले आहेत.)**


१. **संचित कर्म** १०

१ अ. व्याख्या १ आ. समानार्थी शब्द १०

१ इ. संचित कर्माची फळे एकामागून एक अशी भोगावी लागणे १०

१ ई. सर्वसाधारण व्यक्ती, उन्नत आणि अवतार यांच्या संचित कर्माचे प्रमाण १०

१ उ. सर्वसाधारण व्यक्ती आणि ७० टक्के पातळीचे उन्नत यांच्या संचितातील सुख-दुःखाचे प्रमाण ११

१ ऊ. पुढील काही जन्म आणि सुखदायक अन् दुःखदायक संचित कर्मांचे प्रमाण ११

२. **प्रारब्धकर्म (दैव, भाग्य, नियती)** १२

२ अ. व्याख्या आणि अर्थ १२

२ आ. प्रारब्धाचे महत्त्व आणि वैशिष्ट्ये १४

२ इ. प्रारब्धभोग भोगावा लागण्याची प्रक्रिया / कारणे २१

२ ई. प्रारब्ध न पालटता त्याचे भोग भोगावेच लागणे २४

२ उ. प्रारब्धाचे प्रकार २ ऊ. प्रारब्धकर्म आणि इतर कर्मे २८

२ ए. प्रारब्धभोगावर मात कशी करता येते ? ३९

२ ऐ. उन्नत आणि प्रारब्ध २ ओ. ईश्वर आणि मानवाचे प्रारब्ध ५६

२ औ. मनुष्येतर प्राणीमात्रांचे प्रारब्ध ६९

२ अं. निर्जीव गोष्टींचे प्रारब्ध ७०

**३. क्रियमाण कर्म** ७०

३ अ. व्याख्या ३ आ. समानार्थी शब्द ७०

३ इ. प्रक्रिया ३ ई. महत्त्व ७१

३ उ. प्रारब्ध आणि क्रियमाण कर्म ७६

**४. संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण कर्म नष्ट करण्यासाठी ज्ञानाची उपयुक्तता** ९२

४ अ. ज्ञानाग्नीने संचित आणि क्रियमाण कर्मे जळून भस्म होणे ९२

४ आ. ज्या क्षणी ‘अहं ब्रह्मास्मि’च्या साक्षात्काराने ‘हे शरीर म्हणजे मी’ हा अध्यास नष्ट होतो, त्याच क्षणी प्रारब्ध समाप्त होणे ९३

४ इ. ज्ञान्याचे शुभाशुभ क्रियमाण कर्म आणि इतर ९३

**卐 ‘संचित, प्रारब्ध आणि क्रियमाण कर्म’विषयीचे सखोल ज्ञान** ९६

**卐 प्रस्तुत ग्रंथाचे अध्यात्मशास्त्रीय परिभाषेतील सार !** ९७

**卐 संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती** १०३

---

**टीप :** ग्रंथात काही सूत्रांच्या शेवटी मराठी किंवा इंग्रजी संकेतांक केवळ कार्यालयीन सोयीसाठी दिले आहेत.

# मनोगत

'दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा । पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा ॥' पितृआज्ञेनुसार वनवास पत्करणाऱ्या श्रीरामाला जेव्हा भरत पुनःपुन्हा अयोध्येला परतण्याविषयी आर्जवू लागतो, तेव्हा श्रीरामाने भरताला उद्देशून हे उद्‌गार काढले. मनुष्याचे जीवन पराधीन म्हणजे प्रारब्धाच्या अधीन आहे, हा यातील बोध आहे.

कर्मसिद्धांताप्रमाणे चांगल्या-वाईट कर्मांची सुख-दुःखस्वरूपातील फळे या किंवा पुढच्या जन्मांत भोगावीच लागतात. पूर्वीच्या जन्मांतील कर्मांचे जे भोग भोगावयाचे शिल्लक राहिलेले असतात, ते मनुष्याचे 'संचित कर्म', तर त्यांतील जे भोग मनुष्य या जन्मात भोगतो, ते 'प्रारब्धकर्म'. 'बुद्धिः कर्मानुसारिणी ।' म्हणजे प्रारब्धानुसार कर्म करण्याची बुद्धी मनुष्याला होते. युधिष्ठिर एवढा धर्मज्ञानी असतांनाही त्याने द्युतात द्रौपदीला पणाला लावले, याचे कारण प्रारब्ध ! प्रारब्धाचे भोग सर्वांना, अगदी संतांनाही भोगावेच लागतात. प्रारब्धावर मात करण्याचा उपाय म्हणजेच 'क्रियमाण कर्म'.

प्रारब्धानुसार बुद्धीने वागावे कि नाही, हे बुद्धीच्या प्रगल्भतेवर अवलंबून असते. बुद्धीची प्रगल्भता सत्त्वगुणाच्या धारणेवर अवलंबून असते आणि सत्त्वगुणाची धारणा साधनेवर अवलंबून असते. प्रारब्धाचे भोग ज्या वेळी येतात, त्या वेळी व्यक्तीवर असलेल्या संस्कारांमुळे तिला सुख-दुःखाची जाणीव होत असते; पण जर संस्कारच नष्ट झाले, तर सुख-दुःख जाणवणारच नाही. प्रारब्धानुसार देहभोग चुकणार नाहीत; पण भोग 'भोग'च वाटत नसतील तर ते भोग कसले ? साधनेमुळे नेमके हेच साध्य होते. साधनेमुळे संचित कर्मही नष्ट पावते; म्हणून संचित आणि प्रारब्ध यांपेक्षा क्रियमाणच नि:संशय श्रेष्ठ आहे.

'हा ग्रंथ वाचून क्रियमाण अधिकाधिक साधनेसाठी वापरून सर्वांनी लवकर ईश्वरप्राप्ती करून घ्यावी', ही श्रीगुरुचरणी प्रार्थना. – **संकलक**